# प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी स्वीकारला पदभार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे सातवे प्र-कुलगुरू म्हणून प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी आज आपल्या पदाचा कार्यभार कुटुंबीयांच्या साक्षीने स्वीकारला. आज सकाळी डॉ. पाटील यांनी प्रथेप्रमाणे शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब, कर्मवीर भाऊराव पाटील, कर्मवीर डॉ. बापूजी साळुंखे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांना पुष्प वाहून अभिवादन केले. या वेळी त्यांच्यासमवेत पत्नी सौ. शिल्पा पाटील आणि मुलगे अखिलेश व आर्यन होते. त्यांच्यासह त्यांनी मुख्य प्रशासकीय इमारतीत प्रवेश केला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी डॉ. पाटील यांचे त्यांच्या दालनात स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी ग्रंथभेट देऊन स्वागत केले. डॉ. पाटील हे विद्यार्थिप्रिय शिक्षक असल्याने याप्रसंगी त्यांचे पदार्थविज्ञान व नॅनोसायन्स व तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थी आवर्जून उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे नूतन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे त्यांच्या दालनात ग्रंथ भेट देऊन स्वागत करताना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.

# प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी स्वीकारला कार्यभार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे सातवे प्र-कुलगुरू म्हणून प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी कार्यभार स्वीकारला. यावेळी त्यांच्यासमवेत पत्नी शिल्पा पाटील आणि मुलगे अखिलेश व आर्यन होते. त्यांच्यासह त्यांनी मुख्य प्रशासकीय इमारतीत प्रवेश केला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी त्यांचे त्यांच्या दालनात स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी ग्रंथ भेट देऊन स्वागत केले.

दरम्यान, प्र-कुलगुरू डॉ. पाटील हे शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. के. बी. पवार यांचे जावई. विद्यापीठ प्रांगणातील कर्मवीर भाऊराव पाटील यांचा पुतळा हा डॉ. पवार यांच्या कारकीर्दीत १९८८ मध्ये उभारण्यात आला. कर्मवीरांच्या पुतळ्याला अभिवादन करताना डॉ. पवार यांच्या आठवणीने डॉ. पाटील गहिवरले.

# विद्यापीठ अधिनियमांबाबत समितीची १४-१५ रोजी सभा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ आणि नवीन शैक्षणिक धोरणाबाबत समिती गठित करण्यात आली आहे. या अधिनियमांबाबत समितीस सूचना देण्याची संधी विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींना देण्यात येणार आहे. त्यासाठी या समितीमधील 'महाराष्ट्र स्टेट युनिव्हर्सिटी ॲक्ट इव्हॅल्युशन कमिटी' या उपसमितीची सभा दि. १४ व १५ डिसेंबर रोजी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ मध्ये अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी आणि नवे शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने करावयाच्या सुधारणांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठण करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने दि. १४ डिसेंबर रोजी दुपारी १२.१५ ते १ या वेळेत सदर समिती राजर्षी शाहू सभागृह, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे विद्यापीठाशी निगडित विविध विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत संवाद साधणार आहे.